**निशाण ४८**

# मुद्दे

**नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०२२**

सीएनआरक्र. : **MHRT080001452022**

**लक्ष्मण भागोजी बाईग व. २**

**विरुध्द**

**मुरलीधर गुणाजी बाईग व. ७**

---

**वादमुद्दे निश्चिती दिनांक २५ सप्टेंबर २०२३**

---

**१.** वादी हे सिध्द करतात काय की, वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांची तसेच त्यांच्या कुटुंबियाची श्रीदेव बोरेश्वर मंदीरामध्ये महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी ६.०० ते ११.३० च्या कालावधीमध्ये पुजाअर्चा, जलवृष्टी, महारुद्राभिषेक, महाशिवरात्री वाती प्रज्वलीत करणे व महाआरती करण्याचा हक्क आहे ?

**२.** वादी हे सिध्द करतात काय की, प्रतिवादी क्र. १ ते ३ वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्या धार्मीक कार्यात त्यांचा हक्क नाकारुन त्यांना अडथळा निर्माण करतात ?

**३.** वादी हे सिध्द करतात काय की, मागणी केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ हक्क ठराव मिळवून घेण्यास पात्र आहेत ?

**४.** वादी हे सिध्द करतात काय की, वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ६ प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द मागणी केल्याप्रमाणे निरंतरची ताकीद मिळविण्यास पात्र आहेत ?

**५.** प्रतिवादी क्र. १ व २ हे सिध्द करतात काय की, दावा आवश्यक पक्षकारांच्या अभावी फेटाळला जाण्यास पात्र आहे ?

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.09.26 17:18:58 +0530

६. प्रतिवादी क्र. १ व २ हे सिध्द करतात काय की, वादीने representative suit या कार्यपध्दतीची पुर्तता केली नाही?

७. प्रतिवादी क्र. १ व २ हे सिध्द करतात काय की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या पुर्वजांच्या दरम्यान रे.दि.मु.नं. ३०/१९४३ हा दावा दाखल होता?

८. प्रतिवादी क्र. १ व २ हे सिध्द करतात काय की, या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या पुर्वजांचे हक्क अधिकार ठरवून दिलेले होते?

९. प्रतिवादी क्र. १ व २ हे सिध्द करतात काय की, ट्रस्टच्या अधिपत्याखाली वर उल्लेखीत ट्रस्टचे प्रतिवादी क्र. १ वंशपरंपरेने विश्वस्त आहेत?

१० काय आदेश ?

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.09.26 17:19:04 +0530

**स्थळ - देवरुख**
**दि. २५/०९/२०२३.**

**श्रुती ह. पाटील**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**